# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 06/02/2020 (गुरूवार)
# (सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :–अंतर्गत 3 कि.मी. सुपरटाऊन गहुहिवरा रोडवर डडुरेचे मकान जवळ कन्हान येथे दिनांक 05/02/2020 चे 18:50 वा. ते 19:15 वा. दरम्यान फिर्यादीचा भाऊ नामे– संघपाल उमाजी चव्हान हे त्यांच्या मुला व मुलीसह कन्हान वरून सामान घेवुन त्याच्या एमएच–40/वो–6036 क्रमांकाच्या स्प्लेंडर मोटारसायकलने गहुहिवरा रोडने घरी जात होते. दरम्यान विरूद्ध दिशेने येणारा एमएच–40/ए–5076 क्रमांकाचा ट्रॉलीचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक संघपाल चव्हान हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी दवाखान्यात नेले असता डॉक्टरसाहेबानी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रविण उमाजी चव्हान, वय 33 वर्ष, रा. कांद्री कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राहुल ठेंगणे 9823364147 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर मकरधोकडा शिवार येथे दिनांक 28/01/2020 चे 14.15 वा. दरम्यान सौ. निलम जिवा जगताप, वय 33 वर्षे, रा. मकरधोकडा ता. उमरेड या घरी स्वयंपाक करीत असतांना अचानक चुलीवरील खिडकी मधील रॉकेलचा दिवा त्यांच्या अंगावर पडला. दरम्यान निलम जगताप या जळाल्याने उपचारादरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दिनांक 30/01/2020 चे 15.40 वा. त्यांचा मृत्यू झाला. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जिवा मनोहर जगताप, वय 33 वषे, रा. मकरधोकडा, ता. उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास महिला पोलिस निरीक्षक सोनाली राठोड7038583989 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर